




# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर



छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद

दैनिक प्रीतिसंगममध्ये छोट्या जाहिराती प्रसिद्धीसाठी देवून सहकार्य करा..

संपर्क

कराड-२२७७२५/७३५०६४२३९४
सातारा कार्यालय-९२२६३९८८१७



वर्ष २८ वे | अंक १६७ | पाने ४ | शुक्रवार | दि.१८ ऑक्टोबर २०२४ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# विधानसभेच्या जागावाटपाचा निर्णय लवकरच

**कराड/प्रतिनिधी:-**

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढविण्यात येणार आहे. यामध्ये जागा वाटपाबाबत आमचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील चर्चा करत आहेत. आतापर्यंत २८८ जागांपैकी २०० जागांवर एकमत झाले असून बाकीच्या जागांबाबत आज होणाऱ्या बैठकीत चर्चा होईल, अशी माहिती माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी दिली.



कराड येथे माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची उपस्थिती होती. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत विचारले असता शरद पवार म्हणाले, न्याय देवतेच्या डोळ्यांवरील काळी पट्टी काढण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह असून न्याय देवतेच्या हातात तराजू ऐवजी संविधान देण्यात आल्याची बाबही चांगली आहे.

सरन्यायाधीश यांनी घेतला हा निर्णय अत्यंत योग्य असून देशात असा निर्णय कधीच झाला नसता, तो त्यांनी घेतला आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मनोज जरांगे-पाटील यांच्या विधानसभा निवडणूक लढवण्याबाबतच्या निर्णयाबाबत शरद पवार म्हणाले, मनोज जरांगे-पाटील यांनी राज्यात विधानसभा निवडणूक लढवण्याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप घेतलेला नाही. त्यांचा ठाम निर्णय झाल्यानंतरच यावर बोलणे उचित होईल.

सातारा लोकसभा मतदारसंघात पिपाणी चिन्हामुळे झालेल्या नुकसानीबाबत ते म्हणाले, लोकसभा निवडणुकीमध्ये आमचे चित्र स्पष्ट नव्हते. परंतु, यावेळी विधानसभा निवडणुकीत ते चित्र अत्यंत स्पष्ट आहे.

त्यामुळे या निवडणुकीत तुतारी आणि पिपाणी चंदन मध्ये गफलत न होता पिपाणीचा कोणत्याही प्रकारे फटका बसणार नाही, अशी आपण अपेक्षा करूया, असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

बबनदादा यांच्या भेटीबाबत ते म्हणाले, सध्या राज्यात विधानसभा निवडणुकांची धामधूम सुरू आहे. त्याबरोबरच अन्य कारणांसाठीही अनेकजण भेटायला येत असतात. त्यामुळे कुणी भेटायला आलं, तर आपण काय करणार?. बबनदादा कित्येक वर्ष आमच्या सोबत आहेत. आमच्याच विचाराने ते आमदार झालेत. त्यांनी जी भूमिका घेतली होती, त्यामुळे जनतेत नाराजी होती. परंतु, आता त्यांनी वेगळी भूमिका घेतली असली तरी, आमच्यातला सलोखा काही संपत नाही, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्याबाबत ते म्हणाले, महाविकास आघाडीतील मुख्य घटक पक्षांची प्रेस झाल्यानंतर हा विषय संपुष्टात येईल. तसेच मुख्यमंत्री पदावर आपला दावा आहे का? यावर ते म्हणाले, आधी निवडणुकीचा निकाल तर लागू द्या. मग त्या संदर्भात बोलू.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले, आज महाविकास आघाडीची जागा वाटपासंदर्भात बैठक होणार असून त्यामध्ये जागा वाटपाबाबतचे सूत्र ठरवण्यात येईल. राष्ट्रवादी पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष म्हणून माझ्यावर जास्तीत जास्त जागा निवडून आणण्याची जबाबदारी आहे. तसेच बाहेरील पक्षातून आमच्याकडे येणाऱ्यांची संख्या जास्त आहे. परंतु, आमच्याकडे अनेक चांगले तरुण चेहरे असून त्यांना आम्ही प्राधान्याने संधी देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# मनोज जरांगेंनी १८०० वर इच्छुकांसोबत केली चर्चा

## आज केवळ चर्चा,अंतिम बैठकीत समाज निर्णय घेणार

**जालना/वृत्तसंस्था:-**



मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी गुरूवारी दिवसभरात समाजाकडून उमेदवारी मिळावी म्हणून अर्ज केलेल्या १८०० वर इच्छुकांशी चर्चा केली. या चर्चेत काही इच्छुकांनी निवडणूक लढविण्याचा तर काहींनी सत्ताधाऱ्यांना पाडण्याचा आग्रह धरला. आज केवळ चर्चा झाली असून,अंतिम निर्णय हा २० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या बैठकीत समाज घेणार असल्याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

मराठा आरक्षण आंदोलन, निवडणुकांबाबत आज इच्छुकांशी चर्चा केली आहे. पुढे कसे जायचे, निवडणुकीचे चांगले-वाईट परिणाम यासह इतर बाबींवर चर्चा झाली. आम्हाला ९५ टक्के समाजकारण आणि ५ टक्के राजकारण करायचे आहे. त्यामुळे राज्यातील सर्व समाज महत्त्वाचा आहे. आज मराठा समाजासह मुस्लिम, मागासवर्गीय, १८ पगड जातीतील समाजाचे अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे आज केवळ चर्चा झाली आहे. १८०० वर इच्छुकांचे अर्ज आले आहेत. याला गर्दी न म्हणता समाजाच्या आक्रोशाची लाट म्हणता येईल. ही लाट शंभर टक्के विजयाकडे जाणार असल्याचा विश्वास जरांगे पाटील यांनी व्यक्त केला. शेवटी लढायचे की पाडायचे याचा अंतिम निर्णय हा समाज घेणार असल्याचेही जरांगे पाटील यांनी सांगितले.

आगामी विधानसभेत लढायचे की पाडायचे यावर जरांगे पाटील यांनी इच्छुकांना अंतरवाली सराटी येथे बैठकीसाठी बोलाविले होते. अंतरवाली सराटी हजारोच्या संख्येने इच्छुक उपस्थित होते. यादरम्यान लढायचे की पाडायचे याबाबत सर्वांनी आपले मते मांडली.

# हवाला लुटीतील मुख्य सुत्रधाराचा शोध सुरू

## दीड कोटींवर रक्कम हस्तगत:१० संशयित ताब्यात

**कराड/प्रतिनिधी:-**

मुंबईहून हुबळीला हवालाची रक्कम घेऊन निघालेल्या कारमधील तीन कोटींची रक्कम कार अडवून ढेबेवाडी फाटा येथे परवा पहाटे लुटण्यात आली. या चोरी प्रकरणातील दहा संशयीत पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. त्यांच्याकडून चोरीच्या तीन कोटींपैकी तब्बल दिड कोटींची रक्कमही पोलिसांनी जप्त केली आहे. या प्रकरणातील मुख्य सुत्रधारासह अन्य दोघे फरार असून त्यांच्या मागावर पोलीस असून त्यांच्या शोधार्थ पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. रात्री उशिरापर्तंय ते सापडतील, असा पोलिसांचा अंदाज आहे. उद्यापर्यंत सर्व गोष्टी स्पष्ट झाल्यानंतर सविस्तर माहिती देण्यात येईल, असे पोलिस निरिक्षक राम ताशीलदार यांनी स्पष्ट केले.

याबाबत पोलिसांनी दिलेली महिती अशी की, तीन कोटींची रक्कम कार अडवून ढेबेवाडी फाटा येथे परवा पहाटे लुटण्यात आली. त्यात कराडच्या कुख्यात गुंडासह त्याच्या साथीदारांचा समावेश होता, असे पोलिस तपासात स्पष्ट झाले. चोरीची फिर्याद काल रात्री उशिरा कार चालक शैलेश घाडगे यांनी दिली. त्यात तीन कोटींची रक्कम लंपास झाल्याचे म्हटले आहे. त्या चोरीच्या तपासासाठी सहा पोलिस पथके काल वेगवेगळ्या जिल्ह्यात रवाना झाली आहेत. होती. अन्य एक पथक अद्यापही परराज्यात आहे. अन्य जिल्ह्यात रवाना झालेल्या पाच पोलिस पथकांना चांगले यश आले आहे. त्यांनी चोरीच्या टोळीतील दहा जणांना काल रात्री उशिरा ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून तब्बल दिड कोटींची रक्कमही पोलिसांनी जप्त केली आहे. यातील मुख्य सुत्रधारासह अन्य दोन संशयीत फरार आहेत. तर जप्त रकमेतील तांत्रिक तपास अद्यापही अपूर्ण आहे. त्यामुळे त्याबाबतची सविस्तर माहिती उद्यापर्यंत स्पष्ट होईल, असे पोलिस निरिक्षक ताशीलदार यांनी सांगितले. ताब्यात घेतलेल्या संशयीतांची नावेही खात्री करण्याचे काम सुरू आहे, त्याची नावे उद्या देऊ, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण

**सातारा/प्रतिनिधी:-**

अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा तालुक्यातील एका गावातून १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञाताने अपहरण केले. ही घटना दि. ९ ऑक्टोबर रोजी घडली असून सातारा तालुका पोलीस ठाण्यात याची नोंद झाली आहे.

# गळफास घेवून एकाची आत्महत्या

**सातारा/प्रतिनिधी:-**

गळफास घेवून एकाने आत्महत्या केल्याची नोंद शाहूपुरी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, तुळशीराम व्यंकट भोसले (वय ३९, रा. दौलतनगर, सातारा) यांनी राहते घरी गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना दि. १६ ऑक्टोबर रोजी समोर आली. या घटनेची शाहूपुरी पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे.

# जुगार प्रकरणी दोन जणांवर कारवाई

**सातारा/प्रतिनिधी:-**

बॉम्बे रेस्टॉरंट, वर्ये ता.सातारा येथे जुगार प्रकरणी पोलिसांनी दोन ठिकाणी कारवाई करुन गुन्हे दाखल केले.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, बॉम्बे रेस्टॉरंट येथे शुभम सत्यवान कांबळे (वय २६, रा.विकासनगर, सातारा) याच्यावर कारवाई करत रोख १२५० रुपये जुगाराचे साहित्य जप्त केले.

# कराडचे पोलीस निरीक्षक के.एन.पाटील यांची बदली मॅटने केली रद्द

**कराड/प्रतिनिधी:-**

तीन दिवसापूर्वी रात्रीत झालेली शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक के. एन. पाटील यांची तडकाफडकी बदली मुंबईच्या महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण म्हणजेच मॅट न्यायलयाने रद्द ठरवली. पोलिस निरिक्षक पाटील यांची जिल्हा पोलिस अधीक्षकांनी बदली केली होती त्या बदलीच्या निर्णयाविरोधात पाटील यांनी मॅटमध्ये धाव घेतली होती. त्याचा बुधवारी रात्री निकाल झाला. त्यात पोलिस निरिक्षक पाटील यांची बदली रद्द केली आहे.

कराड शहर चे पोलिस निरिक्षक के.ऐन.पाटील यांच्या जागी राजू ताशीलदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलिस अधीक्षक समीर शेख यांनी तीन दिवसापूर्वी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली आहे, निवडणुकीच्या काळात होणाऱ्या बदल्यांच्या नियमानुसार पोलिस निरिक्षक पाटील यांची बदली झाल्याचे पोलिस अधीक्षक समीर शेख यांनी स्पष्ट केले होते. येथील शहर पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरिक्षकपदावर के. एन. पाटील यांची आठ महिन्यांपूर्वी नियुक्ती झाली होती. पदभार स्विकारून केवळ आठ महिन्यांचा कालावधी होतो ना होतो तोच त्यांची परवा रात्री बदली झाल्याने खळबळ उडाली होती. पोलिस निरिक्षक पाटील यांनी लोकसभा निवडणुकीसह गणेशोत्सवात काम केले होते. पोलिस निरिक्षक पाटील यांची तडकाफडकी बदलीचे आदेश देण्यात आळे होते. पाटील यांची प्रशासकीय कारणास्तव बदली झाल्याचे पोलिस उपाधीक्षक अमोल ठाकूर यांनी सांगितले होते. ती बदली तात्पुरत्या स्वरूपाची आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले होते. पोलिस अधीक्षक शेख यांनीही पोलिस निरिक्षक पाटील यांची झालेली बदली तांत्रिक कारणाने आहे. निवडणुक आयोगाने दिलेल्या काही महत्वाच्या नियमानुसार झाली आहे. त्याचे कारण स्पष्ट करता येणार नाही. पोलिस निरिक्षक पाटील यांनी त्या आदेशाच्या विरोधात मुंबईच्या महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण म्हणजेच मॅट न्यायलयात धाव घेतली होती. तेथे त्यांच्या खटल्याचा दोन दिवसात निकाल झाला. त्यात त्यांची तडकाफडकी बदली रद्द करण्यात आली आहे.

# महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या

**सातारा/प्रतिनिधी:-**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या पाच दशकांमध्ये शरद पवार यांच्यासारखे दिग्गज नेते होते मात्र त्यांनी मराठा आरक्षणासह पश्चिम महाराष्ट्राच्या सिंचन योजना लटकत ठेवल्या त्यांनी स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी इतरांना वंचित ठेवण्याचे काम केले गेल्या पाच वर्षांमध्ये महाराष्ट्रात विकासाची जी फळे आहेत ती महायुती सरकारमुळे दिसत आहेत त्यामुळे यंदाच्या निवडणुकीतही महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी मतदार राज्याने जिल्ह्यातील महायुतीच्या सर्व उमेदवारांना निवडून द्यावे असे आवाहन खासदार उदयनराजे भोसले यांनी केले.




भारतीय जनता पार्टीच्या वतीने येथील लेक व्हयू हॉटेलमध्ये आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला यावेळी सातारा जावळी या दोन तालुक्यातील बहुसंख्य पदाधिकारी उपस्थित होते त्यावेळी खासदार उदयनराजे भोसले बोलत होते व्यासपीठावर महाराष्ट्राचे प्रभारी अजय जामवाल आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले सुनील काटकर अविनाश कदम भरत पाटील सौरभ शिंदे रंजना रावत निशांत पाटील अशोक मोने माजी सभापती वसंतराव मानकुमरे, ज्ञानदेव रांजणे इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

उदयनराजे भोसले म्हणाले काँग्रेसने गेल्या ५० वर्षांमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सांगितलेल्या सत्ता विकेंद्रीकरणाला मूठ माती देऊन घराणेशाही सुरू ठेवली आहे महाराष्ट्राच्या विकासाचे निर्णय बरीच

पान ३ वर

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारे नगर विकास आघाडीचे पक्षप्रतोद अविनाश कदम यांनी अनावधानाने शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा खासदार म्हणून उल्लेख केला .त्यावेळी दालनात एकच हशा पिकला तो संदर्भ पकडून उदयनराजे भोसले मांडले मला कोणीही विचारले तर मी माझे नाव आमदार शिवेंद्रसिंहराजे सांगतो त्यांच्यासाठी मी खासदारकीचा राजीनामा द्यायला तयार आहे ते खासदार होऊ देत मी आमदार होतो अशी मिश्किल टिप्पणी त्यांनी केली मात्र शिवेंद्रसिंह राजे व उदयनराजे हे एकच आहेत कार्यकर्त्यांनी याबाबत काळजी करू नये असा ठाम विश्वास उदयनराजे यांनी कार्यकर्त्यांना दिला.

## रतन रत्न ..

सकाळ ते सायंकाळ
टाटा उत्पादन सवय
गोडीला खारटझालर
चवीला मीठचं हवयं
टाट वाहनातून प्रवास
आपली सतावते सय
दर्जेला दर्जा सर्वोत्तम
मगकुणाची नाही गय
टाटा स्टील सारखाचं
असावा निर्धार निश्चय
आधार देता मदतीचा
मानवतेशी वाङ्निश्चय
नॅनोतून फिरतात स्वप्ने
सामान्य सुख निरामय
रे सेवा सकलजनतेची
ऋग्णालय हो अनामय
निःस्पृहतेला देता धडा
पैलू उलघडता विस्मय
कळला नाहीत संपूर्ण
अजूनि अपूर्ण परिचय
एकाचव्यक्तीत साठला
बहुगुणांचा रे समुच्चय
इतिहासऐके टवकारुन
निघता रतनरत्न विषय
का नेलेस आमच्यातून
काळावरी येतो संशय
अखर्वात एखादेचं रत्न
साक्षात अमृतजलाशय

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# कराड उत्तरमधील पर्याय काय ?

## सध्या तरी लढत एकास एकच, चर्चा आतल्या गोटातली

**उंब्रज/अनिल कदम:-**

कराड उत्तर विधानसभा मतदकराड उत्तर विधानसभा मतदारसंघात सध्या तरी एकास एक लढतीसाठी महायुती विचाराधीन असून भाजपच्या आतल्या गोटातील खबरीनुसार मनोज घोरपडे किंवा रामकृष्ण वेताळ यांच्यापैकी एका नावावर जवळपास शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा गोपनीय सूत्रांच्या हवाल्याने उपलब्ध झाली आहे.यासाठी सध्या सुरू असलेल्या बऱ्याच घडामोडी याची साक्ष देत आहे.उमेदवार कराड तालुक्यातील स्थानिक असावा की इतर याबाबत मतदारांच्या मनात नेमके काय सुरू आहे याची चाचपणी केली असता भारतीय जनता पार्टीने बरेच रान तापविले असल्याने गावोगावी कार्यकर्ता तयार झाला आहे महिलांचा सहभाग आणि प्रतिसाद उत्तम असून परिवर्तन यात्रा आणि मनोजबंध कार्यक्रम यामुळे वातावरण ढवळून निघाले आहे.परंतु महाविकास आघाडीची उंब्रज येथे झालेली शिवस्वराज्य यात्रेची सभा विद्यमान आमदार बाळासाहेब पाटील यांची मतदार संघातील पकड किती मजबूत आहे याची साक्ष देणारी ठरली आहे.यामुळे महायुतीला एकास एक लढत झाली तरच निकराची लढाई देता येणार असल्याचा साक्षात्कार झाला असल्याने उमेदवारीचा निर्णय फायनल झाला असल्याबाबत कुणकुण असून लवकरच याबाबत घोषणा होण्याची शक्यता आहे कारण उमेदवारांनी कितीही पूर्वतयारी केली तरी अंतिम लढाईला तयार तर व्हावेच लागणार आहे.यामुळे कराड उत्तरमधील विधानसभा उमेदवारांचे पर्याय काय आणि सध्या तरी लढत एकास एकच होणार असल्याची चर्चा आतल्या गोटातली माहिती आहे.

आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर अंतिम आणि निर्णायक लढाईबाबत मतदारसंघातील नागरिक महायुतीच्या उमेदवारी बाबत उत्सुक असून महाविकास आघाडीची उमेदवारी विद्यमान आ.बाळासाहेब पाटील यांना मिळणार याबाबत घोषणेची औपचारिकता बाकी आहे कारण उंब्रज येथील सभेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांची उमेदवारी एकप्रकारे जाहिरच करून टाकली आहे.सुमारे एक लाख मतदार कराड तालुक्यातील असून यासाठी रामकृष्ण वेताळ योग्य उमेदवार असल्याची मागणी होत आहे तर सातारा आणि कोरेगाव तालुक्यातील महायुतीच्या आमदारांनी मनोज घोरपडे यांच्या पारड्यात वजन टाकले आहे.पाटणचे आमदार नसती भानगड गळ्यात नको म्हणून नामानिराळे राहून सुपणे तांबवे गटातील नाराजीचा फटका बसू नये यासाठी दूर पळत आहेत.तर खटाव माण परिसरातून विद्यमान आमदार कुरबुरत तरी का होईना परंतु एकमत होऊन महायुतीचा एकच उमेदवार असल्याबाबत बाबतीत प्रतिकूल झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.कारण त्यांनाच मोठा संघर्ष करावा लागण्याची चिन्हे दिसत असल्याने 'आपलं झाकून ठेऊन'वाकून बघायला त्यांना किती सवड मिळेल याबाबत साशंकता व्यक्त होत आहे.

सातारा,कराड,पाटण,माण-खटाव,आणि कोरेगाव अशा पाच विधानसभा मतदारसंघाच्या सीमेवर वसलेला कराड उत्तर मतदारसंघ आणि मतदारांची संख्या त्यांच्या समस्या या तालुक्यातील बदलानुसार भिन्न आहेत एकच समस्या सर्वत्र एकसमान आहे ती म्हणजे बेरोजगारी व महागाई या प्रश्नांचा सामना सत्ताधारी कसा करतात आणि विरोधक किती तापवतात यावर अवलंबून असणार आहे.कराड उत्तरेत पक्ष फुटीचा तोटा झाला नसला तरी काही प्रमुख गावातील पदाधिकारी इकडे तिकडे असल्याने मुख्य लढत ही भारतीय जनता पार्टी विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट अशीच राहणार असून महाविकास आघाडी अथवा महायुतीच्या इतर घटक पक्षांची भूमिका काय याबाबत सवाल उपस्थित होणार आहे.




### काँग्रेस काय करणार

कराड उत्तर मधील राष्ट्रीय काँग्रेसचे कार्यकर्ते बाजारसमितीच्या निवडणुकीनंतर सुरक्षित अंतर राखून राहत असल्याने शरीराने महाविकास आघाडीत परंतु मनाने कुठ याबाबतीत विविध मतप्रवाह मतदारांच्यात निर्माण झाले आहेत.यांची मोट कोण बांधणार याबाबत मोठी चर्चा आहे.कारण आ.पृथ्वीराज चव्हाण आणि उदयसिंह पाटील उंडाळकर यांचा मोठा गट याठिकाणी निर्णायक भूमिकेत असल्याने महाविकास आघाडी म्हणून वाटेल ती किंमत मोजून मनोमिलन।करावे।लागणार आहे.तर महायुतीचा या दुफळीचा कसा फायदा उचलणार यावरच यशापयश अवलंबून राहणार आहे.

### शिवसेनेचे नितीन बानूगडे पाटील अज्ञानवासात

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपनेते नितीन बानूगडे पाटील महायुतीत एकनाथ शिंदेंनी स्थलांतर केल्यानंतर अचानक दिसेनासे झाले यामुळे ते नाराज आहेत का ? उद्धव ठाकरे गटाने त्यांना जाणीवपूर्वक हाताच्या अंतरावर ठेवले आहे का ? याबाबत कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात उलटसुलट चर्चा सुरू आहेत.शिवसेनेचे बानूगडे पाटील अज्ञानवासात जाणीवपूर्वक गेले की घालवले आणि उत्तरेतील शिवसैनिक काय भूमिका घेणार कारण महाविकास आघाडी म्हणून लढताना सर्वच सहकारी पक्षांचा पाठिंबा आवश्यक असणार आहे.परंतु यासाठी सर्व पक्ष एकत्र आहेत याबाबत उमेदवाराने पुढाकार घेतला पाहिजे नाहीतर एकला चलो ही भूमिका निवडणुकीच्या अंतिम टप्यात घातक ठरणार आहे.

# जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघातील जागा माजी सैनिक लढवणार

## भारतीय जवान किसान पार्टीचे सातारा जिल्हाध्यक्ष प्रशांत कदम यांची माहिती



**कराड/प्रतिनिधी :-**
सैनिक, माजी सैनिक, शहीद जवानांच्या कुटुंबीयांसह शेतकरी, बहुजनांना न्याय मिळवून देण्यासाठी सातारा लोकसभेची निवडणूक लढवली होती. त्यानुसार आता जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघातील जागाही माजी सैनिक लढवणार आहेत, अशी माहिती सैनिक फेडरेशनचे सातारा जिल्हाध्यक्ष, तसेच भारतीय जवान किसान पार्टीचे सातारा जिल्हाध्यक्ष प्रशांत कदम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कदम म्हणाले, मागील काही दशकांपासून सत्ताधारी व विरोधी पक्षाकडून आजी/माजी सैनिकांसह त्यांचे कुटुंबिय आणि शहीद जवानांच्या कुटुंबियांकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनाही सैनिकांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास वेळ नाही. त्यामुळे जिल्ह्यातील आज-माजी सैनिकांसह शहीद जवानांच्या कुटुंबीयांमध्ये तीव्र नाराज आहे.

सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत २५ जून २०२४ मध्ये सैनिकांचे अर्थिक विकास महामंडळ निर्माण करावे, आजी-माजी सैनिकांना महामार्गावर टोलमाफी द्यावी, माजी सैनिकांना सन १९७१ मध्ये मिळालेल्या सरकारी जमिनी वन विभागाकडून निर्वनिकरण करुन वर्ग दोन मधून वर्ग एकमध्ये करावे, सन १९६५, १९७१, १९९९ या युद्धांमध्ये शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांना सरकारी जमिनी द्याव्यात, आजी-माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांसाठी संरक्षण कायद्याची अंमलबजावणी करावी, शिक्षक व पदवीधर आमदारांप्रमाणे विधान परिषदेवर सैनिकांचा प्रतिनिधी म्हणून माजी सैनिक आमदार नियुक्त करावा आदी मागण्यांवर चर्चा करण्यात आली होती. परंतु, त्या कागदावरच राहिल्या असून हे सरकार सैनिकांचे प्रलंबित प्रश्न व मागण्या मार्गी लावण्याच्या बाबतीत अपयशी ठरले आहे.

सातारा जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात भारतीय सेनेतील व पॅरामिलेटरी फोर्समधील आजी-माजी सैनिक व त्यांचे कुटुंबिय व शहीद जवानांच्या कुटुंबीयांचे मतदान ४५ हजारच्या वर आहे. त्यामुळे आता स्वतःच्या समस्या व प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी सैनिक फेडरेशन व भारतीय जवान किसान पार्टी व सर्व माजी सैनिकांनी विधानसभा निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सातारा जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात आम्ही माजी सैनिक उमेदवार उभे करणार आहोत. या निवडणुकीत माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांचे मते निर्णय ठरतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी सैनिक फेडरेशनसह जिल्ह्यातील आजी-माजी सैनिक, शहीद जवानांचे कुटुंबीय, तसेच शेतकरी उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या

पान१ वरुन

वर्ष प्रलंबित राहिले होते यशवंतरावांच्या यशवंत विचारांचा विसर काँग्रेसला पडला असून जातीय तेढ निर्माण करण्याचे पाप काँग्रेसने केले आहे राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्यासारखे दिग्गज नेते असताना महाराष्ट्रातील सिंचनाचे रोजगाराचे शिवाय मराठा आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित राहिले हे प्रश्न सोडवण्यासाठी पवार यांचा कोणी हात धरला होता का त्यांच्यावर कोणाचा दडपण होतं का असे बरेच प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात .शिवरायांचा जनकल्याणाचा सर्व समावेशक विचार केंद्रात भाजपने आणि राज्यात महायुती सरकारने अमलात आणला आहे विरोधकांनी महाराष्ट्राला भूलथापा देण्यात आलेले काही केले नाही त्यामुळे त्यांनी आरोप करताना स्वतः पहिले आत्मपरीक्षण करावे अशी घणाघाती टोलेबाजी उदयनराजे यांनी केली महायुतीच्या जिल्ह्यातील उमेदवारांना आपण भरभरून आशीर्वाद द्यावेत जेणेकरून महाराष्ट्राची गेल्या पाच वर्षापासून ची प्रगती यापुढेही अखंड सुरू राहील याकरिता उमेदवार निवडून कशी येतील याकडे लक्ष द्या असे कळकळीचे आवाहन उदयनराजे यांनी केले.

आमदार शिवेंद्रसिंहराजे बोलताना पुढे म्हणाले निवडणूक आल्या की विरोधक आमदारकीसाठी बाशिंग बांधून तयार असतात .मात्र गेल्या पाच वर्षात विकासाचा कोणताही ठोस कार्यक्रम त्यांनी राबवलेला नाही सत्तेच्या प्रवाहात असतानाही काहींनी केवळ काही न करता आमदारकीसाठी आता दावा ठोकला आहे मात्र गेल्या पाच वर्षात सातारा व जावली तालुक्यात महायुतीच्या माध्यमातून प्रचंड विकास कामे झाली आहेत सातारा जावळीतील जनता ही सतर्क व हुशार असून त्यांनी या विकास कामांचा अनुभव घेतला आहे त्यांचा आशीर्वाद हीच माझ्या कामाची पोच पावती आहे त्यामुळे मला माझ्या विजयाची खात्री आहे आपण हीच विकास कामे सर्वांनी शेवटच्या तळातील माणसापर्यंत पोहोचू या आणि जनतेचे आशीर्वाद घेऊया अशी अपेक्षा आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र प्रभारी अजय जामवाल म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ध्येय धोरणामुळे भारताला जगात वेगळे स्थान मिळाले आहे ज्या देशात मोदींना विरोध होत होता त्याच देशांनी आता भारताच्या स्वागताचे रेड कार्पेट घातले आहे भारताला २०१७ मध्ये विश्वगुरू करण्यासाठी अनेक विकासाच्या योजना राबवल्या जात आहेत मोदींचे हात बळकट करण्यासाठी महाराष्ट्रामध्ये सुद्धा महायुतीची सत्ता आली पाहिजे त्याकरिता रणनीती निश्चित करण्यात आली आहे विकास कामांचा प्रसार व प्रचार आणि वार्डावरडामध्ये शंभर टक्के मतदान कसे होईल याकरता कार्यकर्त्यांनी झपाटून कामाला लागावे असे आवाहन त्यांनी केले.

# नळदुर्ग येथील आपलं घर ट्रक पलटी ;दोन जण जखमी

## आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी गेलेल्या भक्तांना परतीचा प्रवास पडला महाग



**नळदुर्ग/प्रतिनिधी:**
नळदुर्ग येथे राष्ट्रीय हायवे वरती धरित्री विद्यालय नळदुर्ग आपलं घर या ठिकाणी हैदराबाद सोलापूर हायवे रोडवर टँकर पलटी होऊन दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत तुळजापूरच्या आई तुळजा भवानीच्या दर्शनासाठी गेलेल्या भक्तांचा परतीच्या प्रवास सुरू झाला आहे .

राष्ट्रीय हायवे आई तुळजाभवानीच्या दर्शनाच्या साठी दर्शन घेऊन परतीचा प्रवास करत असल्याने सदरील गाड्यांची वर्दळ खूप मोठ्या प्रमाणात असल्याने हा चक्का जाम झाला तर याच ठिकाणी अलीयाबादच्या आपलं घर धरित्री विद्यालयाच्या समोर एक 'टँकर पलटी झाल्याने तेथील हाये वरती खूप गाड्यांची रांगा लागल्या आहेत गाडयांची रहदारी वाढल्याने सदरील भक्तांना परत जाताना तारेवरची कसरत करावी लागत आहे भक्तांची गर्दीमुळे आणि तेथील ट्रॅक क्र ऋग ३६ द २२३३ ही ट्रक पल्टी झाल्यामुळे त्यामधील दोन प्रवासी जखमी झाले असून १) रजका मोहम्मद व ३४ वर्ष रा राजस्थान २ ) भोपेंद्रसिंग वय ३१ वर्ष रा राजस्थान त्यांना तात्काळ नळदुर्ग येथे उपजिल्हा लोकर रुग्णालयात आले आहे.

यामुळे चक्का जाम झाला आहे हायवे पोलीस पो हे कॉ सतीश पवार , पो हे कॉ प्रशांत वाघचौरे पो हे कॉ बापूदेव काकडे पो कॉ पंकज कोळी , पो कॉ केशव कांबळे पो कॉ विजयकुमार मोरे पो कॉ राजकुमार क्षिरसागर पो कॉ समाधान लांडगे हे सर्वजन रस्ता खुला करण्याचा प्रयत्न करत आहेत हैदराबाद ते राजस्थान कडे जाणारी ट्रक क्रमांक ऋा.३६.द.२२३३ ही ट्रक आपलं घर शाळेजवळील कॉर्नर मध्ये ड्रायव्हरचा ताबा सुटल्याने पलटी झाला त्यामध्ये दोन जण जखमी झाले १)रजाक मोहम्मद वय ३४वर्ष रा. राजस्थान २) भोपेन्द्र सिंग वय ३१ वर्ष रा. राजस्थान हे दोन जण जखमी झाले

सदरील अपघाताची माहिती मिळताच नळदुर्ग पॉईंट येथे गेले तेरा वर्ष अपघात ग्रस्ताच्या मदतीला मोफत असलेले जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान नानिज्धाम ची रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल होऊन जखमीला उपजिल्हा रुग्णालय नळदुर्ग येथे दाखल करण्यात आले आहेत .

# आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे भाषा व साहित्य समृद्ध होईल

## प्राचार्या सौ. शुभांगी गावडे



**नागठाणे/प्रतिनिधी:**
भारतात शेकडो भाषा बोलल्या जातात, तसेच हजारो बोलीभाषा आहेत. डिजिटल समावेश वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने स्थानिक भाषांमध्ये डिजिटल सेवा कशा उपलब्ध करून देता येतील याचाही विचार करून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने ज्या भाषा आता बोलल्या जात नाहीत त्या कशा पुनरुज्जीवित केल्या जाऊ शकतात यावर देखील काम केल्यास भाषा आणि साहित्य खूप समृद्ध होईल असे उदगार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित आर्टस , कॉमर्स ण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सव वर्षाचे औचित्य साधून इंग्रजी विभाग व इंग्लिश लँग्वेज टिचर्स असोसिएशन ऑफ इंडिया, सातारा चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'A study of Language and Literature: Opportunities and Challenges in the -I Era" या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारच्या उदघाटनप्रसंगी त्या प्रमुख उदघाटक म्हणून बोलत होत्या.

प्राचार्या सौ. शुभांगी गावडे आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या , कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ एक नवीन तंत्रज्ञान नाही, तर ती जगभरातील चळवळ बनली आहे. आज भारत एआय तंत्रज्ञाना संबंधित प्रतिभा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेशी जोडल्या गेलेल्या नवीन संकल्पना यातला सर्वात मुख्य घटक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा विस्तार खूप अधिक वाढत असून आपल्या नवीन भविष्याला घडवण्याचा एक मोठा आधार बनणार आहे.

राष्ट्रीय वेबिनारमध्ये बिजभाषक म्हणून नांदेड विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. दिलीप चव्हाण यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. वेबिनारच्या प्रथम सत्रात शिवाजी विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. मनोहर वासवाणी व व द्वितीय सत्रात गुजरात राज्यातील डॉ.विशाल वरीया यांनी प्रमुख वक्ते म्हणून भारतात आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्राची भविष्यातली दिशा आणि भाषा व साहित्य संधी आणि आव्हाने यावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय वेबिनारच्या उदघाटन समारंभास प्राचार्य डॉ राजेंद्र शेजवळ सदस्य व्यवस्थापन परिषद शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर , माजी प्राचार्य डॉ.अशोक करांडे व प्रो.(डॉ) उज्वला ताटे उपस्थित होते.

राष्ट्रीय वेबिनारमध्ये एआय आणि साहित्य व भाषेसमोर असणाऱ्या संधी व आव्हाने यावर अभ्यासपूर्ण चर्चा करण्यात आली. वेबिनारसाठी एकुण ११८ अभ्यासकांनी सहभाग नोंदवला तर जवळपास पन्नास अभ्यासपूर्ण संशोधनपर लेख प्राप्त झाले आहेत. वेबिनारचे यशस्वी आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले, राष्ट्रीय वेबिनार यशस्वी करण्यासाठी डॉ. ज्ञानदेव काळे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुरेश पाटील, श्रीमती मनिषा सुतार, अशोक गाडेकर, श्रीमती शैला चोबे यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

# कवी शशिकांत पार्टे यांना अमृतभूषण पुरस्कार प्रदान

## 'वृद्धांमृत' काव्यात अमृतवाडीच्या गाव, शिवार,निसर्ग दर्शनाबद्दल सन्मान




**सातारा/प्रतिनिधी:**
पश्चिम महाराष्टातील सातारा जिल्ह्यातील अमृतवाडी गावचे ज्येष्ठ कवी शशिकांत पार्टे याना श्री पद्मावती देवी सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ,अमृतवाडी या मंडळाने नुकतेच'अमृत भूषण 'पुरस्कार देऊन सन्मानित केले. अमृतवाडी गावचे सरपंच सचिन रत्नपारखे, महादेव पाटील,उप सरपंच हगवणे ,डॉ,संग्राम थोरात व इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांना अमृतभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.या वेळी त्यांना दिलेल्या मानपत्रात' आदरणीय कविवर्य शशिकांत पार्टे भाऊ .आपण अमृतवाडी गावचे जेष्ठ नागरिक आहात. आपले काम हे तरुणाला लाजवेल असे आहे. आपली गावाविषयी असणारी तळमळ आपल्या प्रत्येक कृतीतून आम्हाला जाणवते.आपण कवी मनाचे आहात .वृद्धांमृत भाग १ व भाग २ या आपल्या कविता संग्रहात आपण अमृतवाडी गावातील ग्रामस्थाबरोबरच आई पदमावती देवी,पशु पक्षी,झाडे वेली व शिवार यांना आपल्या मराठी साहित्य लेखनात मोलाचे स्थान दिले. आपण अमृतवाडी गावचे भूषण आहात .गावातील शैक्षणिक ,सामाजिक ,आणि सांस्कृतिक कार्यात आपण दिलेल्या असाधारण योगदाना विषयी कृतज्ञता व्यक करीत आपणास आम्ही सर्व श्री पद्मावती देवी सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ व अमृतवाडी गावचे ग्रामस्थ यांचे तर्फे कृतज्ञतापूर्वक हा अमृतभूषण पुरस्कार सन्मानपूर्वक देत आहोत' असे लेखन करण्यात आलेले आहे.

. ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. सचिनरत्नपारखे यांनी अमृतभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. कॉलेज,हायस्कूल ,मराठी शाळा,मतीमंद मुलांची शाळा ,अनाथ वसतिगृह येथे स्वतः जाऊन स्वतःच्या पेन्शन मधून पैसे देणगी रूपाने दिले. शाळा ,कॉलेजला कपाटे भेट दिली. काव्य लेखन केले, रिटायर झाल्यानंतर आणि आजारी असल्यावर देखील कॉटवर पडून न राहता नित्यनेमाने समाज उपयोगी कार्यात दान केले आहे. स्वतःच्या लेखनाने गावाचा सन्मान त्यांनी वाढवलेला आहे. शांत ,संयमी ,सदाचारी ,विचारी ,जागरूक व सर्जनशील असे प्रतिभाशाली व्यक्तिमत्व शशिकांत भाऊ पार्टे आहेत. त्यांच्या मनात अनेकविध प्रकारच्या चांगल्या कल्पना येत असतात आणि ते त्या साकार करीत असतात. सुविचार व सदाचार असे त्यांचे जीवन असून त्यांनी अनेकांना मदत करून पुण्य मिळविले आहे. मराठी भाषेला सद्गुणी विचार देण्याचे योगदान दिलेले आहे.नवरात्र उत्सवात देखील त्यांनी सढळ हाताने देणगी दिली आहे. सत्कार्यासाठी सतत देणगी देणारे ,व आपसात जिव्हाळा निर्माण करणारे असे हे व्यक्तिमत्व असल्याने ग्रामस्थांनी त्यांना 'अमृत भूषण पुरस्कार 'देऊन त्यांचा गौरव केल्याचे त्यांनी सांगितले. कवी शशिकांत पार्टे यांना अमृतभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेक साहित्यिक ,कवी व संस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

# अलियाबाद शिवारात राजरोस पणे खडक मुरुमांचे अवैध रित्या उत्खनन सुरू

## महसुल विभागाच्या अधिकाऱ्यांचे अक्षम दुर्लक्ष

**नळदुर्ग/प्रतिनिधी:**
नळदुर्ग जवळ आलियाबाद शिवारामध्ये डोंगर कोरून खूप मोठ्या प्रमाणात उत्खनन करून चड्या भावाने विक्रीला जात आसुन या सर्व गोष्टी पाहता तुळजापूरचे तहसिलदार यानी तथा नळदुर्ग येथील अप्पर तहसिल कार्यालयाचे तहसिलदार संबंधितांनी कोणत्या पद्धतीची उत्खनन रॉयल्टी भरली आहे का?

जर रॉयल्टी भरली आसेल तर त्याचे रात्री उशिरापर्यंत काम होते आणि रॉयल्टी जरी भरली नसेल तर त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आसे नागरिकांतुन बोलले जात आहे महसूल विभागाला कसल्याही प्रकारची माहिती न देता हे उत्खनन चालू आहे अलियाबाद शिवारातील डोंगर फोडुन उत्खनन करून चढया भावाने बाजार करत आहेत . खडक मरमाचे उत्खनन बंद करून संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी अलियाबाद येथील नागरिकांनी केली आहे.

या ठिकाणचा लेखाजोगा केला बाजूला असलेल्या राष्ट्रीय हायवे क्रमांकाच्या बाजूला डोंगर भाग फोडून त्याची राज रोजरास पणे खडक मुरमाची विक्री होत आहे महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी या गोष्टीकडे लक्ष घालून संबंधितावर योग्य ते करावे असे मागणी नागरिकातून होत आहे.

# समाज प्रबोधन सार्वजनिक वाचनालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**कोळे/प्रतिनिधी:**
समाज प्रबोधन सार्वजनिक वाचनालय,मलकापूर ता.कराड येथे 'वाचन प्रेरणा दिन ' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाचनालयाचे अध्यक्ष शेती मित्र मा.अशोकराव थोरात (भाऊ) यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमास वाचनालयाचे अध्यक्ष, संचालक, सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, सभासद, ग्रामस्थ उपस्थित होते. 'वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने 'एका पुस्तकाचे वाचन' हा उपक्रम आ. च. विद्यालय मलकापूर, आदर्श प्राथमिक विषयालय आगाशिवनगर, आदर्श प्राथमिक विद्यालय मलकापूर, कन्याशाळा मलकापूर या शाळांतील एका वर्गावर राबवण्यात आला. वाचन प्रेरणा दिनाच्या औचित्य साधून उपस्थित शाळेतील शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ भेट देण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. अशोकराव थोरात यांनी डॉ. कलाम यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून उपस्थितांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल सौ. वैशाली शेवाळे यांनी केले,सूत्रसंचालन संचालक सदस्य सौ रंजना काटवटे यांनी केले.उपाध्यक्षा सौ सुरेखा खंडागळे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा तयार केली. खजिनदार विशांत थोरात यांनी वाचनाचे फायदे स्पष्ट केले. मुख्याध्यापिका सौ.एस.व्ही. भिसे यांनी वाचाल तर वाचाल' याचा अर्थ विशद केला. संचालक सदस्य सुधाकर शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास एम.पी.फराळे, सौ.वनिता येडगे, सचिन शिंदे, सौ.ज्योती शिंदे, हेमंत शिर्के, ग्रामस्थ उपस्थित होते.



# नाट्य शिवप्रतिष्ठान महाबळेश्वरची कार्यकारिणी जाहीर

## तालुक्यातील एकमेव नोंदणीकृत नाट्य संस्था म्हणून ओळख



**महाबळेश्वर/प्रतिनिधी:-**
तालुक्यातील नाट्य चळवळीला चालना देण्यासाठी मागील जवळपास ४५ वर्षे कार्यरत असलेल्या नाट्य शिवप्रतिष्ठान महाबळेश्वर संस्थेला धर्मादाय आयुक्त यांचे नोंदणी प्रमाणपत्र मिळाले असून संस्थेची कार्यकारिणी जाहीर झाली आहे. या अनुषंगाने संस्थेची पहिली मासिक सभा देखील मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात आज संपन्न झाली.

सभेच्या सुरुवातीला शहरासह तालुक्यातील नाट्य क्षेत्रातील दिवंगत कलाकारांना श्रद्धांजली वाहण्यात आली.यावेळी सभेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे नियामक मंडळ सदस्य राजेश कुंभारदरे उपस्थित होते.

संस्थेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अध्यक्ष ज्येष्ठ नाट्यकर्मी किसनराव खामकर यांचा सत्कार महाबळेश्वरचे माजी नगराध्यक्ष प्रभाकर देवकर व पंचायत समितीचे माजी सभापती विजयराव भिलारे यांच्या हस्ते करण्यात आला. आपले मनोगत व्यक्त करताना राजेश कुंभारदरे यांनी महाबळेश्वर शहरासह ग्रामीण भागात नाट्य चळवळीला चालना देण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील व नाट्य क्षेत्रात काम करणाऱ्या कलाकारांना हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करून महाबळेश्वरचे नाव महाराष्ट्राच्या नाट्य क्षेत्रात उज्वल करण्याची ग्वाही दिली.

जाहीर झालेल्या कार्यकारिणी मध्ये अध्यक्ष, किसनराव खामकर.उपाध्यक्ष, प्रभाकर देवकर, सचिव, अरुण शिंगरे, खजिनदार संदीप देवकुळे व सदस्य म्हणून राजेश कुंभारदरे, विजयराव भिलारे, चिन्मय अगरकर, रणजित तांबे, गोविंद कदम, रविकांत संकपाळ, दिपक बावळेकर यांची निवड करण्यात आली आहे.संस्थेच्या वतीने लवकरच शालेय स्तरावर नाट्य स्पर्धेच्या माध्यमातून हौशी कलाकारांना प्रोत्साहन देऊन नाट्य चळवळीला चालना देण्यासाठी प्रयत्न केले जातील असे विजयराव भिलारे म्हणाले.

संस्थेची सभासद नोंदणी सुरू करण्यात आली असून ईच्छूकांनी लवकरात लवकर संस्थेशी संपर्क साधावा असे आवाहन किसनराव खामकर यांनी केले आहे. तालुक्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी संस्थेला नोंदणी प्रमाणपत्र मिळाल्याबद्दल अभिनंदन व शुभेच्छा दिल्या आहेत.

# महावाचनमध्ये कु.आराध्या कांबळे यांचे सुयश

**सातारा/प्रतिनिधी:**
महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई महावाचन उत्सव २०२४ चे प्रशस्तीपत्र कु.आराध्या सतीश कांबळे यांना प्रदान करण्यात आले.



आराध्या ही न्यू एच पब्लिक स्कुल, पनवेल येथे इ.५ मध्ये शिकत आहे. महावाचन उत्सव या उपक्रमात सहभाग घेतल्याबद्धल प्रशस्तीपत्र देण्यात आले आहे. त्यावर मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे व शालेय शिक्षणमंत्री ना.दीपक केसरकर यांच्या स्वाक्षरी आहेत.याबद्धल शिक्षणप्रेमी व अनेकांनी अभिनंदन केले.




# विघ्नहर्ता डान्स स्टुडिओच्या गरबा दांडिया स्पर्धेला अक्कलकोट येथे मोठा प्रतिसाद

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**
अक्कलकोट येथे विघ्नहर्ता डान्स स्टुडिओ यांच्या वतीने तालुका स्तरीय गरबा दांडिया स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या या गरबा दांडिया स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला.

दरवर्षी नवरात्रोत्सवात या गरबा दांडिया स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते.

या स्पर्धेचे आयोजक आणि डान्स प्रशिक्षक सोनू वाघमोडे, चित्रकार कलाकार सचिन घंटे, तालुका क्रिकेट संघाचे प्रमुख सागर बनसोडे, सहाय्यक सागर सुतार, दौलप्पा जोगदे, स्वामीराव वाघमोडे, मयुरी पुरोहित, सुनिता हिडोळे प्रायोजक स्मिता महेंद्रकर, मनीषा धोंगडे, शितल झिंगाडे,व बसवराज भोले, विजयराज खेडगीकरआदींनी या स्पर्धेसाठी परिश्रम घेवून या रिविहर उत्साहात पार पाडल्या आहेत. विघ्नहर्ता डान्स स्टुडिओ आयोजित अक्कलकोट तालुकास्तरीय गरबा दांडिया स्पर्धाचे दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही आयोजन केले होते.


सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

नशिबाची परीक्षा
शुक्रवार १८ ऑक्टोबर २०२४

मिलनम डे
उदय-अस्त | सिंगल ०-४-३ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 190 280 460 | 0-2 | 156 | 06-12-45-39-28 |

कल्याणम
उदय-अस्त | सिंगल ७-५-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 124 467 700 | 7-1 | 146 128 119 | 76-01-25-93-18 |

मुंबैम (मेन )
उदय-अस्त | सिंगल ९-२-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 180 289 388 | 9-6 | 150 240 600 | 91-36-20-57-68 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

आज का अंदाज

शुक्रवार दिनांक १८ ऑक्टोबर २०२४

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| 'पत्थर फोड एकच' | 'पत्थर फोड एकच' |
| २ - ३ - ६ - ९ | २ - ५ - ६ - ७ |
| १५६-१२०-१६९-१३५ | १५६-७८०-६००-७०० |
| ५७०-२४७-३४९-३६० | ३९०-६९०-५५६-२५० |
| ४८०-६७०-२४०-५६८ | ६६०-५००-७९०-८९० |
| जोडी | जोडी |
| २० - ३० - ६१ - ९१ | २० - ५० - ६८ - ७२ |
| २४ - ३४ - ६७ - ९७ | २१ - ५१ - ६९ - ७८ |
| २८ - ३८ - ६५ - ९५ | २२ - ५३ - ६३ - ७९ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १८-१९ऑक्टोबर
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

शुक्रवार दिनांक १८ ऑक्टोबर २०२४

| सर्व बाजार साठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | १० | ४० | ७२ | ८२ |
| | १९ | ४९ | ७३ | ८३ |
| | १६ | ४६ | ७५ | ८५ |
| | १५५ | २२० | १७९ | १८९ |
| | ५८८ | ६९९ | ३५९ | ३६९ |
| | ३९९ | ३५६ | २५० | ४६८ |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# सातार्‍यातील पुरातन मंदिरात प्राचीन पटखेळांचे अवशेष

## पुरातत्त्वज्ञ सोज्वळ साळी व साक्षी महामुलकर यांचे संशोधन





**सातारा/प्रतिनिधी:** प्राचीन खेळ संवर्धन मोहीम (महाराष्ट्र राज्य) अंतर्गत संपूर्ण राज्यभर ऐतिहासिक प्राचीन पटखेळांच्या अवशेषांचा शोध व संवर्धनाचे कार्य सुरू असून अनेक जिल्ह्यांनंतर आता 'सातारा' जिल्ह्यात असे प्राचीन पटखेळांचे अवशेष शोधण्यात यश आले आहे. या मोहिमेचे सर्वेसर्वा नाशिकचे पुरात्वज्ञ सोज्वळ शैलेंद्र साळी व सातारच्या साक्षी बाबासाहेब महामुलकर या अभ्यासकांनी सातार्‍यातील वाई तालुक्यातील भुईंज जवळच्या किकली गावातील पुरातन भैरवनाथ मंदिरात प्राचीन पटखेळांचे संशोधन केले आहे. या खेळांचे दस्तावेजीकरण व नोंद झाली असून सातार्‍याच्या इतिहासात ही मोलाची भर म्हणावी लागेल.


इतिहासात प्राचीन काळी मनोरंजनासाठी विविध खेळ खेळले जात होते. पचीसी,चतुरंग सारख्या कित्येक बैठ्या खेळांचा उगम भारतातलाच तर काही खेळ या मातीतल्या समृध्द प्राचीन व्यापारामुळे इथल्या व्यापारमार्गे भारतात आले. आजही त्यांचे कोरीव अवशेष आपल्याला विविध ऐतिहासिक ठिकाणी पहायला मिळतात. प्राचीन लेण्यांमध्ये, मंदिरांत, घाटांवर अशा विविध ठिकाणी जमिनीवर, दगडांवर अशा पटखेळांचे अवशेष आढळतात. या ऐतिहासिक खुणांतून इतिहास उलघडण्याचे काम या मोहिमेच्या माध्यमातून होत आहे. महाराष्ट्रातील वेरूळ, नाशिक, पुणे, सोलापूर, कोल्हापूर या व याहून अनेक ठिकाणी प्राचीन व्यापारी मार्गांच्या खुणा प्रकाशझोतात आल्या आहेत. आता सातार्‍यातील संशोधनाने या यादीत व जिल्हा आणि राज्याच्या प्राचीन इतिहासात नक्कीच महत्त्वपूर्ण वाढ झाली आहे.

सध्याच्या किकली गावात स्थित असणारे प्राचीन 'भैरवनाथ मंदिर' हे इसवी सनाच्या १२-१४ व्या शतकातील असून 'यादवकालीन' स्थापत्याचे आणि 'भूमिज' मंदिरशैलीचे ते एक उत्कृष्ट उदाहरण आहे. देवगिरीच्या यादवांचा राजा सिंघणदेव पहिला हा या देखण्या मंदिराचा निर्माता असल्याचे म्हटले जाते. याचं मंदिरात एकूण सात पटखेळांचे पुरातत्त्वीय अवशेष आढळून आले आहेत. यात नवकंकरी, वाघ-बकरी, पंचखेलिया आणि अष्टचल्लस या प्राचीन बैठ्या खेळांचा समावेश आहे. प्राचीन इजिप्त, रोम, नेपाळ तसेच प्राचीन सिलोन म्हणजेच आताचे श्रीलंका इ. ठिकाणी या खेळांचे उगम व संदर्भ सापडताना दिसतात. या सर्व ठिकाणी आपला समृध्द प्राचीन व्यापार चालत असे व त्यामुळेचं विविध प्रांतातले हे खेळ व्यापारमार्गे अनेक व्यापार्‍यांमार्फत इथे कोरून ठेवल्याचे दिसते. हे खेळ म्हणजे जगभरातील संस्कृतीच्या अन् प्राचीन व्यापारी मार्गांच्या खुणा आहेत. म्हणूनचं लिखित साधनांनंतर आता सातार्‍यातील या पुरातत्त्वीय संशोधनामुळे कराडसह वाईचा भाग हा सुमारे २००० वर्षांपूर्वीचा प्राचीन व्यापारी मार्ग होता यालाही दुजोरा मिळत आहे. एवढ्या वर्षांपूर्वी भारत हा आपल्या वैभवशाली व्यापारासाठी जगप्रसिद्ध होता. तलम कापड, मसाल्याचे पदार्थ, चंदन, कस्तुरी, भांडी, दागदागिने यांसारख्या कित्येक वस्तू आपला देश फक्त निर्यात करत होता ही केवढी मोठी बाब ! आणि याचं प्राचीन भारतीय व्यापारात, महाराष्ट्रातील एक केंद्र होता तो सातार्‍यातील वाईचा भाग. म्हणूनचं वाई परिसरातील भैरवनाथ मंदिरात मिळालेले हे प्राचीन पटखेळांचे अवशेष आजही आपल्याला त्या तेजस्वी इतिहासाची, समृध्द प्राचीन व्यापाराची ओळख करून देत आहेत असं म्हणणेच योग्य ठरेल.

'इतिहास' हा कायमचं आपल्या वर्तमानाचा पाया अन् भविष्याचा मार्गदर्शक राहिला आहे, आणि त्याचा अभ्यास नेहमीच आपल्याला नवी शिकवण देत असतो. म्हणूनचं या प्राचीन खेळांचे संपूर्ण अभ्यासपूर्ण संशोधन शोधनिबंधातून सादर होणार असून हा प्राचीन ठेवा स्थानिकांसह सर्व पर्यटकांपर्यंत पोहचायला हवा असे मत अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

सातारा जिल्ह्यातील भैरवनाथ मंदिरामध्ये प्राचीन पट खेळ मिळाले आहेत, असेच अजून खेळ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु हे खेळ सापडले असले तरी यांचे संवर्धन होणे गरजेचे आहे. त्यासाठी पुरातत्व विभाग, स्थानिक प्रशासन व गावकरी यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

सोज्वळ साळी, पुरातत्वज्ञ प्राचीन पट खेळ संवर्धन मोहीम प्रमुख सातारा जिल्ह्यात प्रथमच सापडलेले हे प्राचीन पटखेळांचे अवशेष म्हणजे आमच्या प्रमाणेच या मातीतील प्रत्येकासाठी आनंदाची गोष्ट आहे. हा ऐतिहासिक ठेवा इथल्या प्रत्येक सर्वसामान्यांचा आहे, जो प्राचीन भारताच्या गौरवशाली आंतरराष्ट्रीय व्यापाराशी निगडीत आहे. म्हणूनचं त्याच्या प्रचार-प्रसाराबरोबरचं त्याच्या जतन संवर्धनाचं कर्तव्यही आपणा सर्वांचं आहे. साक्षी महामुलकर, इतिहास अभ्यासक



प्राचीन पटखेळांचे अवशेष

# खानापूर मतदारसंघामध्ये ३ लाख ४८ हजार मतदार

## निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.विक्रमसिंह बांदल यांची माहिती



**विटा/प्रतिनिधी:** खानापूर मतदार संघात एकूण मतदार संख्या ३ लाख ४८ हजार ७१३ आहे. विधानसभा निवडणुकीसाठी मतदार नोंदणीची प्रक्रिया १९ ऑक्टोंबर अखेर चालणार आहे. तरी अद्याप ज्यांनी नाव नोंदले नसेल त्यांनी त्वरित नोंदणी करून घ्यावी. असे आव्हान प्रांत अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ . विक्रमसिंह बांदल यांनी केले आहे.

बांदल यांच्या अध्यक्षतेखाली विटा उपविभागीय पोलीस अधिकारी विपुल पाटील. तहसीलदार योगेश्वर टोपे. आटपाडीचे तहसीलदार सागर ढवळे. विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे, गटविकास अधिकारी डॉक्टर संताजी पाटील, आटपाडीचे गट विकास अधिकारी संदीप भंडारे, यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली डॉक्टर विक्रमसिंह बांदल म्हणाले विटा तहसीलदार कार्यालयात सर्व परवानगी देण्यासाठी एक खिडकी उघडण्यात आली आहे. त्यामधूनच सर्व परवानग्या मिळतील.

२२ ऑक्टोंबर पासून २३ नोव्हेंबर पर्यंत आचारसंहितेचे काटेकोर अंमलबजावणी केली जाणार आहे. यासाठी विविध पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदार संघात एकूण मतदार संख्या.३ लाख ४८ हजार ७१३ इतकी आहे. खानापूर तालुक्यात १ लाख ६२ हजार आटपाडी तालुक्यात १ लाख ३८ हजार तर विसापूर मंडलात ४६ हजार ५५९ मतदार आहेत. अशीही माहिती पत्रकार परिषदेत प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ विक्रमसिंह बांदल यांनी दैनिक प्रीतिसंगम श्री बोलताना सांगितले.

# आचारसंहितेमुळे महिला लोकशाही दिन रद्द

**सातारा/प्रतिनिधी:** ऑक्टोबर महिन्यात सोमवार दि. २१ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथील नियोजन भवनात होणारा महिला लोकशाही दिन विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाली असल्याने संपन्न होणार नाही, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी वि.अं. तावरे यांनी एका पत्रकान्वये दिली आहे.


अ‍ॅड. प्रमोद प्रकाश पवार
शिवणी, ता. कडेगांव, जि. सांगली

## जाहीर नोटीस

कि.कि.अ.नं. /२०२४

संगिता उत्तम पवार |-अर्जदार

**विरुरुद**

ग्रामसेवक, (ग्रामअधिकारी) ग्रामपंचायत शिवणी, ता. कडेगांव, जि. सांगली |- जाबदार

ज्याअर्थी अर्जदारचा जन्म ता. ०१/०६/१९७३ रोजी मौजे शिवणी, ता. कडेगांव, जि. सांगली येथे राहाते घरी झालेला आहे.

अर्जदारचे कुटुंबातील लोक हे कायद्याचे बाबतीत अडाणी अशिक्षीत लोक असलेने अर्जदारचे जन्माची नोंद निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी, मौजे शिवणी, ता. कडेगांव यांचे कार्यालयात नोंद करणेचे राहून गेले आहे. सदरचा अर्ज अर्जदार संगिता उत्तम पवार हिची जन्म नोंद (ता. ०१/०६/१९७३) नोंद निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी, शिवणी, ता. कडेगांव, जि. सांगली यांचे कार्यालयातील रजिष्टरमध्ये नोंद होणेत यावी म्हणून अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, संगिता उत्तम पवार हिचा जन्म ता. ०१/०६/१९७३ रोजी झालेला नाही असे कोणास सांगणेचे असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अगर दि.०३/११/२०२४ रोजी या मे. कोर्टात हजर राहून आपआपल्या हरकती नोंदवाव्यात. जर कोणी मुदतीत हरकती न घेतलेस संगिता उत्तम पवार हिचा जन्म ता. ०१/०६/१९७३ रोजी झालेला असलेबाबतची नोंद घेणेबाबत संबंधित कार्यालयास हुकूम होईल. मागाहून कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाही.

म्हणून माझे सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले जाहीर नोटीस दिली असे.

कडेगांव
दि. ३/१०/२०२४

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**कडेगांव उपविभाग कडेगाव**



अ‍ॅड. प्रमोद प्रकाश पवार

## जाहीर नोटीस

### कडेगांव येथील मे.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साो,यांचे कोर्टात

कि.कि.अ.नं. /२०२४

अल्लाजान अजिज मुल्ला, |-अर्जदार

**विरूध्द**

ग्रामसेवक ग्रामपंचायत, हिंगणगांव बुद्रुक |- जाबदार

ज्याअर्थी अर्जदार अल्लाजान अजिज मुल्ला यांचा जन्म ता. ०१/०६/१९६८ रोजी मौजे हिंगणगांव बुद्रुक, ता. कडेगाव, जि.सांगली येथे झालेला आहे.

अर्जदार यांची जन्माची नोंद निबंधक जन्म, मृत्यू, विवाह नोंदणी मौजे हिंगणगांव बुद्रूक, ता. कडेगांव यांचे कार्यालयात नोंद करणेचे राहून गेले आहे. सदरचा अर्ज अर्जदारचा जन्म (ता. ०१/०६/१९६८) नोंद निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी, हिंगणगांव बुद्रुक, ता. कडेगांव, जि. सांगली यांचे कार्यालयातील रजिष्टरमध्ये नोंद होणेत यावी म्हणून अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदारचा जन्म ता. ०१/०६/१९६८ रोजी मौजे हिंगणगांव बुद्रुक, ता. कडेगांव येथे झालेला आहे व सदरचे जन्माची नोंद होणेबाबत अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, अर्जदारचा जन्म ता. ०१/०६/१९६८ रोजी झालेला नाही असे कोणास सांगणेचे असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अगर दि. ०३/११/२०२४ रोजी या मे. कोर्टात हजर राहून आपआपल्या हरकती नोंदवाव्यात. जर कोणी मुदतीत हरकती न घेतलेस अर्जदारचा जन्म ता. ०१/०६/१९६८ रोजी झालेला असलेबाबतची नोंद घेणेबाबत संबंधित कार्यालयास हुकूम होईल. मागाहून कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाही.

म्हणून माझे सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले जाहीर नोटीस असे.

कडेगांव
दि. ३/१०/२०२४

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**कडेगाव उपविभाग कडेगांव**


# जिल्हा परिषदेच्या कायाकल्प स्पर्धेत चरेगावचे उपकेंद्र जिल्ह्यात प्रथम

## चरेगावच्या शिरपेचात मानाचा तुरा



**चाफळ/प्रतिनिधी:** सातारा जिल्हा परिषदेच्या वतीने कायाकल्प २०२३ या जिल्ह्यातील उत्कृष्ट प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच उपकेंद्रे या दोन गटांमध्ये ठेवलेल्या स्पर्धेमध्ये चरेगाव येथील आरोग्य उपकेंद्राचा जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक आल्याची माहिती चरेगावचे सरपंच देवदत्त पतंगराव माने यांनी दिली. रोख एक लाख रुपये तसेच प्रमाणपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे.

जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग कायाकल्प या नावाने स्पर्धा घेतो. या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र असे दोन गट केले जातात. त्यामध्ये आरोग्य केंद्रे तसेच उपकेंद्रांमध्ये असलेली स्वच्छता, मिळणारी सेवा, रेकॉर्ड, असणार्‍या सोयी सुविधा, राबवत असलेल्या सरकारी योजना आदी गोष्टी तपासल्या जातात. त्यामध्ये विविध आरोग्य केंद्रे तसेच उपकेंद्रे भाग घेतात. जिल्हा परिषदेच्या कमिटीकडून वरील बाबींची तपासणी झाल्यानंतर त्यातून नंबर काढले जातात. त्यानुसार चरेगाव उपकेंद्रात असलेली स्वच्छता,राबवत असलेल्या विविध योजना, आयुष बागेमध्ये लावलेल्या विविध औषधी वनस्पती, रेन हार्वेस्टिंग सिस्टीम, आरोग्य कर्मचार्‍यांची उत्कृष्ट कामगिरी तसेच ग्रामपंचायत व आरोग्य कर्मचारी यांचे सांघिक काम या सर्व गोष्टी तपासून या पुरस्कारासाठी चरेगाव उपकेंद्राची निवड करण्यात आली. सदर चरेगाव उपकेंद्रांतर्गत खालकरवाडी, शितळवाडी, भवानवाडी या गावांचा समावेश होतो.

दरम्यान, आरोग्य उपकेंद्राच्या या यशापाठीमागे आरोग्य समुदाय अधिकारी अश्विनी शेवाळे मॅडम, सिस्टर देशमाने मॅडम,गावातील सर्व आशा सेविका,सरपंच देवदत्त माने, भवानवाडीचे सरपंच प्रवीण यादव, खालकरवाडीचे सरपंच अंकुश खालकर, शितळवाडीचे सरपंच प्रशांत बर्गे, उपसरपंच सारिका डुबल, ग्रामसेवक आतार तसेच ग्रामपंचायत सदस्य यांचे मोलाचे योगदान लाभले. त्या पार्श्वभूमीवर चरेगावच्या उपकेंद्रात सर्व आरोग्य कर्मचार्‍यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता.

यावेळी उंब्रज येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ शुभम जाधव, आरोग्य अधिकारी गरुड रावसाहेब, सर्व कर्मचारी वृंद, चरेगाव, भवानवाडी, शितळवाडी, खालकरवाडी येथील सर्व सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, आशा सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओझर्डे येथे मदन भोसले यांच्या गटातील कार्यकर्त्यांचा आ.मकरंद पाटील गटात प्रवेश



**वाई/प्रतिनिधी:** वाई वाठार रस्त्यावर असलेल्या ओझर्डे ता.वाई गावच्या हद्दीत असणार्या खानापुर स्टॉप येथील मदन भोसले यांच्या गटातील भटकेविमुक्त समाजातील असंख्य पुरुष आणी महिला कार्यकर्त्यांनी आमदार मकरंद पाटील यांचे कट्टर समर्थक खानापुर गावचे युवा सामाजिक कार्यकर्ते व सतत विकास कामांचा धमाका वाजविणारे किसनवीर कारखान्याचे तरुण संचालक किरण काळोखे यांच्या नेतृत्वाखाली आ.मकरंद पाटील यांच्या उपस्थितीत त्यांच्या गटात ऐन निवडणुकीच्या तोंडावरच प्रवेश केल्याने वाई तालुक्यात खळबळ उडाली आहे. या वेळी बंदु भगत, मधुबुवा भगत, लहु चव्हाण, नारायण चव्हाण, भगवान चव्हाण, सुभाष पवार, श्रिरंग चव्हाण मनेष चव्हाण अशा वरील प्रमुख कार्यकर्त्यांनी प्रवेश केल्याने त्यांचा आमदार मकरंद पाटलांनी हार घालुन श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला.

या वेळी आमदार मकरंद पाटील म्हणाले, येथील वसाहती मध्ये ज्या सुविधा करणे आवश्यक आहे त्या त्या सुविधा मि पुरविण्यासाठी वचन बध्द आहे. वसाहतीतील लोकांना मि वार्यावर सोडणार नाही. येथील वसाहतीत पावसाळ्यात नेहमीच मुसळधार पडणार्या पावसाचे पाणी घरा घरात घुसून प्रापंचिक साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते याची माहिती मला आमचे संचालक किरण काळोखे यांनी दिली असल्याने हे पाण्याचे येणारे लोट थोपविण्या साठी मि त्यावर उपाय म्हणून रस्त्याच्या दुतर्फा गटारे काढुन त्यात पायपा टाकुन बंदिस्त गटार खानापुर स्टॉप ते साईनाथ नगर पर्यंत हि योजना राबवली आहे. त्याचा फायदा येथील वसाहती मधील लोकांना नक्कीच होईल. त्याच बरोबर गेल्या कित्येक वर्षांपासून येथील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी व बसण्यासाठी जागा अपुरी पडत होती त्या मुळे येथील शिक्षकांन समोर मोठी समस्या निर्माण झाली होती. या ठिकाणी शाळेला दोन खोल्या बांधण्या इतकी जागा शिल्लक होती पण काहींनी अनेक वर्षा पासुन त्या जागेवर शाळा बांधण्यास विरोध केल्याने तो विषय लोंबकळत पडला होता .अखेर शाळेचा विषय सुटला पाहिजे हा हेतु मनात ठेवुन व त्या साठी पुढाकार घेवुन संचालक किरण काळोखे यांनी दोन गुंठे जागा ऊपलब्ध करुन दिली. त्या ठिकाणी लवकरच शाळाखोल्यांचे बांधकाम आचारसंहिता संपल्यावर सुरु होईल असेही आमदार मकरंद पाटील यांनी या वेळी सांगितले.

राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी कोणाच्याही दबावाला भीक न घालता वस्तीतील सर्व मतदारांनी मोकळे पणाने मला मतदान करावे असे आवाहन आमदार मकरंद पाटील यांनी या वेळी बोलताना केले.

# विक्रमादित्य यादव यांची जलसंधारण अधिकारीपदी निवड



**कराड/प्रतिनिधी** कालेटेक (ता.कराड) येथील विक्रमादित्य दिलीप यादव यांची जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब या पदावर निवड झाली आहे. दरम्यान, मृदा व जलसंधारण विभागाअंतर्गत जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या संवर्गातील रिक्त पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेतुन त्यांची ही निवड झाली आहे.

विक्रमादित्य यादव यांचे माध्यमिक रोटरी शिक्षण संस्था मलकापूर येथे तर उच्च माध्यमिक शिक्षण शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, कराड येथे तर पदवीत्तर शिक्षण नानासाहेब महाडीक कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पेठ येथे पुर्ण झाले. दरम्यान, जुलै २०२४ मध्ये झालेल्या सरळ सेवा परीक्षेमध्ये विक्रमादित्य यादव यांनी घवघवीत यश संपादन करीत जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब या पदावर निवड झाली आहे.

या निवडीबद्दल विक्रमादित्य यांचे माजी मुख्यमंत्री आ.पृथ्वीराज चव्हाण (बाबा), कोयना बँकेचे संस्थापक अ‍ॅड.उदयसिंह पाटील-उंडाळकर, काँग्रेसचे कराड दक्षिण अध्यक्ष मनोहर शिंदे, पै.नानासाहेब पाटील, धनाजी काटकर (सर) आदींनी अभिनंद केले आहे.

# वाईत धोम धरणातून २५२० क्युसेस पाण्याचा विसर्ग

**वाई/प्रतिनिधी:** वाईच्या पश्चिम भागात सध्या मुसळधार पाऊस सुरू असल्याने धोम धरणांच्या पाणलोट क्षेत्रामध्ये येवा मध्ये वाढ झाल्याने धरणांची पाणी पातळी नियंत्रित करणेसाठी आज दि.१७ रोजी रात्री ८ वाजता धोम धरणांच्या सांडव्या वरून चालु असलेला ६०२ क्युसेक्स विसर्ग वाढवून २५२० क्युसेक्स विसर्ग कृष्णा नदीपात्रात सोडण्यात येणार आहे.

पावसाचे प्रमाण व येव्यानुसार त्यामध्ये कपात अथवा वाढ करणेत येईल. सर्व नदी काठावरील ग्रामस्थ, ग्राम प्रशासन यांना आवाहन करण्यात येते की नदी काठावर जाताना काळजी घ्यावी. धरणातून सोडलेले पाणी सोबतच डोंगर परिसरातील ओढे नाले मधून पावसाचे पाणी येऊन विसर्ग मध्ये वाढ होऊ शकते. त्यामुळे सर्वांनी काळजी घ्यावी. ही नम्र विनंती.

# अरुण कचरे कृषिभूषण पुरस्काराने सन्मानित

**कराड/प्रतिनिधी:** वाघेरी (ता. कराड) येथील प्रगतशील सेंद्रीय शेतकरी व खळे (ता. पाटण) गावचे सुपुत्र अरुण चंद्रकांत कचरे यांचा महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्यावतीने कृषिभूषण (सेंद्रीय शेती) पुरस्कार २०२१ ने नुकताच सन्मान झाला. वरळी (मुंबई) येथील नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया येथील भव्य समारंभात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र, रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप होते. पत्नी सौ. रत्नप्रभा कचरे यांच्यासह त्यांनी हा पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी मुले मयुर व संकेत कचरे उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे, कृषी सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रवींद्र भिनवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी भाषणात राज्यातील कृषी क्षेत्राचा आढावा घेत शेती व अधारीत समाजरचनेचा पाया भक्कम करणे गरजेचे वाटते. पुरस्कार प्राप्त शेतकर्‍यांनी आपल्याकडील ज्ञानाचा वापर इतरांना प्रेरणा देण्यासाठी करावा, असे आवाहन केले.



मुंबई : येथील समारंभात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते कृषिभूषण पुरस्कार स्वीकारताना अरुण कचरे व पत्नी सौ. रत्नप्रभा कचरे समवेत ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे व इतर

ना. अजित पवार यांनी भाषणात राज्यातील कृषी क्षेत्राचा विकास दर उंचावत असल्याचे नमूद करत शेतकर्‍यांनी शासकीय योजनांचा लाभ घेवून शेतीत प्रगती साधावी, असे सांगितले. कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी कार्यक्रमाचा आढावा घेतला. कचरे यांनी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व कथा, पटकथा लेखक, गीतकार म्हणून राज्यात नावलौकिक मिळवला आहे. बळीराजाचं राज्य येवू दे, काळूबाईच्या नावानं चांगभलं, कुंडमाऊली मळगंगा या चित्रपट निर्मितीसह कृणाल म्युझिक कॅसेट कंपनीच्या माध्यमातून अडीच हजारपेक्षा अधिक गीतांचे लेखन केले.

झगमगत्या दुनियेला निरोप देवून त्यांनी शेती क्षेत्रात प्रवेश केला. त्यांनी वाघेरी येथे शेती विकत घेवून खडकाळ माळरानावर सेंद्रीय व आधुनिक पद्धतीच्या शेतीला सुरुवात केली. त्यांनी ऊसात पाचट राखणे, काटेकोर पाणी व्यवस्थापन, हिरवळीच्या खतांचा वापर, देशी गाई व आधुनिक शेळीपालन या उत्पादनवाढीच्या बाबींचा शेतीत अवलंब केला. खडकाळ जमीन असूनही त्यामध्ये त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून प्रगती साधली. सेंद्रीय शेतीची कास धरून त्यांनी केलेल्या शेतीतील कार्याची दखल घेवून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. नुकताच त्यांचा राहुरी कृषी विद्यापीठाने पुरस्कार मिळाल्याबद्दल गौरवही केला आहे. याआधी त्यांना सातारा जिल्हा परिषदेने जे. के. बसू सेंद्रीय शेती पुरस्काराने गौरविले आहे.


जिल्हा कृषी अधीक्षक भाग्यश्री फरांदे, उपविभागीय कृषी अधिकारी रियाज मुल्ला, तालुका कृषी अधिकारी दत्तात्रय खरात, सैदापुर मंडळ कृषी अधिकारी अभिजीत पाटील, सर्व अधिकारी व कर्मचार्‍यांचे त्यांना सहकार्य लाभले. व त्यांनी अभिनंदन केले. याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# भले तरी देऊ कासेची लंगोटी.. नाठाळांच्या माथी हाणू काठी

**चाफळ/रघुनाथ थोरात:** संत शिरोमणी जगद्गुरु तुकोबाराय या आपल्या ओवीतून नाठाळ अपप्रवृत्तींवर वज्र प्रहार करत निर्भयपणे लिहितात. त्यांची विचारसरणी अत्यंत सरळ व ठाम होती. या ओवीतील तुकोबांची भाषा अत्यंत स्पष्ट अनुभवजन्य व वास्तव दर्शवणारी आहे. संसारी वाटेने जात असताना सुख राईएवढे दुःख पर्वता एवढे अशी परिस्थिती त्यांच्या वाट्याला आली. त्यांचे जीवन वेड्यावाकड्या वळणांनी,उग्र-दाहक अनुभवांनी भरलेले होते. तुकारामांच्या गाथेने मराठी समाजाला सांस्कृतिक आचरणाचा,जीवनाचा आदर्श दाखवून दिला.

### समाजात फोफावलेली नाठाळ अपप्रवृत्ती

संत शिरोमणी जगद्गुरु तुकोबांच्या या ओवीला अनुसरून आचरण केले तर समाजात फोफावलेल्या नाठाळ अपप्रवृत्तीचे समूळ उच्चाटन होईल. ..!



समाजातील चुकीच्या गोष्टींवर त्यांनी कडाडून हल्ला केला. तुकारामांची अभंगवाणी ही अज्ञानाला ज्ञानी,अडाण्याला शहाणे करण्यासाठी अवतरली.तुकोबांच्या या ओवीतून वेळ पडली तर आम्ही स्वतःची लंगोटीही देऊ इतके आम्ही उदारमतवादी आहोत.परंतु,कोणी आम्हाला कमजोर समजून आमच्या लंगोटीलाच हात घालत असेल तर, आम्ही अशा नाठाळांचे टाळके सडकायलाही कमी करणार नाही..हा भावार्थ स्पष्ट होतो.. अतिशय मृदु स्वभावाच्या तुकोबांचा हा अभंग म्हणजे आजकाल समाजात सर्वत्र फोफावलेल्या नाठाळ अपप्रवृत्तींना मोठी चपराक आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. उपजतच मेणाहून मऊ असलेला व्यक्ती प्रसंगी वज्रालाही भेदू शकणारे काठिण्य अंगी बाळगू शकतो हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. तुकोबांनी वर्ण व्यवस्थेच्या, जातीभेदाच्या भिंती ओलांडून आदर्श समाज निर्मितीसाठी अवघी हयात खर्ची घातली.

समाजातील नाठाळ अपप्रवृत्तींचा प्रतिकार करण्यासाठी स्वभावातील मृदूपणा बाजूला सारून एखाद्या कसलेल्या योद्धाप्रमाणे रणभूमीवर खंबीरपणे आपले पाय घट्ट करीत रणशिंग फुंकणे हेच योद्धयाचे लक्षण आहे. तसेच युद्ध हेच एका वीराचे प्रमाण आहे. त्यामुळे आजकालच्या या युगात फोफावलेल्या नाठाळ अपप्रवृत्तींना ताळयावर आणण्यासाठी तुकोबांच्या या ओवीला अनुसरून आचरण करणे ही काळाची गरज आहे. नाहीतर या अपप्रवृत्ती तुमचे जगणे मुश्किल करतील यात तीळ मात्र शंका नाही...!